(2) after the direction No. (1) the following new direction shall be inserted namely :—

"(1A) the direction No. 1 shall not apply for the renewal of the licences in respect of the Saw Mills, which have been erected or operating prior to the 16th July 1981 under valid licences.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. N. TRIPATHI,
Deputy Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. २८ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२०[illegible]-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण
प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, मार्च १७, २००३/फाल्गुन २६, शके १९२४

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-अ

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ मार्च २००३

अधिसूचना

मुंबई वन नियम, १९४२.

क्रमांक एसडब्ल्यूएम. १०९७/प्र.क्र. ३७९/फ-६.—ज्याअर्थी, मुंबई वन नियम, १९४२ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे) याच्या नियम ८८ च्या पोट-नियम (११) च्या खंड (ब) अन्वये काढलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक एसडब्ल्यूएम. १०८१/१०६८३६-एफ-६, दिनांक १६ जुलै १९८१ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) अनुसार महाराष्ट्र शासनाने, उक्त नियम ८८ अन्वये इमारती लाकडाचे रूपांतरण करण्यासाठी नवीन लायसने देण्याच्या संबंधात लायसन प्राधिकारी, लायसनधारक व इतर संबंधित व्यक्ती यांच्या मार्गदर्शनासाठी निदेश दिलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, रिट विनंती-अर्ज क्रमांक २००१ चा ३६५२ यातील परिच्छेद १६ (तीन) व (चार) मधील दिनांक ७ फेब्रुवारी २००२ रोजीच्या उच्च न्यायालयाच्या आदेशासंदर्भात, लायसन प्राधिकारी, लायसनधारक व इतर संबंधित व्यक्ती यांच्या मार्गदर्शनासाठी आणखी निदेश देणे इष्ट आहे ;

त्याअर्थी आता, उक्त नियमांच्या नियम ८८ च्या पोट-नियम (११) च्या खंड (ब) अनुसार, महाराष्ट्र शासन, याद्वारे, लायसन प्राधिकारी, लायसनधारक आणि इतर संबंधित व्यक्ती यांच्या मार्गदर्शनासाठी निदेश देत आहे आणि त्या प्रयोजनासाठी उक्त अधिसूचनेत पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :–

उक्त अधिसूचनेमध्ये,–

(१) विद्यमान निदेश क्र. (१) मधील, खंड (३) च्या परंतुकामध्ये पुढील **स्पष्टीकरण** जादा दाखल करण्यात येईल :–

" **स्पष्टीकरण**.–शर्त क्र. ३ च्या प्रयोजनार्थ, कोणत्याही वनाच्या सीमेपासून आरागिरणीसाठी १० किलोमीटरचे अंतर मोजताना, रस्त्याजवळील कमीत कमी अंतर विचारात घेण्यात येईल. " ;

(२) निदेश क्रमांक (१) नंतर, पुढील नवीन निदेश समाविष्ट करण्यात येईल :–

" (१अ) ज्या आरागिरण्या वैध लायसनाअन्वये १६ जुलै १९८१ पूर्वी उभारण्यात किंवा सुरू करण्यात आलेल्या आहेत अशा आरागिरण्यांच्या बाबतीत लायसनांच्या नवीकरणासाठी निदेश क्रमांक १ लागू होणार नाही .".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ए. एन. त्रिपाठी,
शासनाचे उप सचिव.



## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 15th March 2003

*NOTIFICATION*

BOMBAY FORESTS RULES, 1942.

No. SWM. 1097/CR-379/F-6.—Whereas under Government Notification, Revenue and Forests Department No. SWM. 1081/106836-F-6, dated the 16th July 1981 (hereinafter referred to as " the said notification ") issued under clause (*b*) of sub-rule (11) of rule 88 of the Bombay Forests Rules, 1942 (hereinafter referred to as " the said rules "), the Government of Maharashtra has issued directions for the guidance of the licensing authorities, licensees and other persons concerned, in regard to the grant of new licences for conversion of timber under the said rule 88 ;

And Whereas with reference to the order of the High Court, dated the 7th February 2002 in para 16 (*iii*) and (*iv*) in Writ Petition No. 3652 of 2001, it is expedient to issue further directions for the guidance of the licensing authorities, licensees and other persons concerned ;

Now, therefore, in pursuance of clause (*b*) of sub-rule (11) of rule 88 of the said rules, the Government of Maharashtra hereby issues directions for guidance of the licensing authorities, licensees and other persons concerned and for that purpose, amends the said notification as follows, namely :—

In the said notification,—

(1) in the existing direction No. (1), in the proviso to clause (3), the following *Explanation* shall be added, namely :—

"*Explanation*.—For the purpose of Condition No. 3, while measuring the distance of 10 kilometers for the Saw Mill from the boundary of any forest, the shortest distance by the road shall be taken into consideration." ;